# राशिभविष्य - फेब्रुवारी, २०२३

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

=============================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आला तर कृपया आम्हांस कळवावे.**

=============================================================

**(१) मेष** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री हर्षल व राहू असे दोन ग्रह असून येथील वक्री हर्षलमुळे स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल,लहरी होण्याची शक्यता दिसते. शिवाय त्याच्यामुळे कोणाचा कसलाही धाक वा दडपण सहन होणार नाही. पण शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होण्याची शक्यता दिसते. येथील राहूमुळे सतत अपमान होणे संभवते. तसे घडल्यास असह्य संताप येईल व सूडभावना प्रबळ होईल. जपा. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची चिंता अस्वस्थ करील. देणे द्यावेच लागेल; पण येणे केव्हा येईल ते सांगता येणार नाही. त्याशिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना उष्णता विकाराचा आजार त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे जीवनसंगिनीचे आचरण लहरी, विक्षिप्त असे होणे संभवते. तसे झाल्यास पतिपत्नीत मतभेद, वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे धनवृद्धी होऊन मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या दशम स्थामी मकर राशीत प्रथमपासून रवि असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक, सामाजिक दर्जा प्राप्त होईल. काही मंडळींचा सन्मान होणेही संभवते. क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शुक्र-शनि-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच;. पैकी येथील शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत जात आहेत. त्यामुळे शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक

होईल. त्याच्यामुळे ऐषाराम,सुखसमाधान, मन:शांती लाभेल. धनलाभ होणेही संभवते. स्वराशीतील शनिही अनुकुल व लाभदायकच होईल. पण त्याच्यामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. येथील नेपच्यूनमुळे कुमार्गी मित्रांपासून नुकसान होणे संभवते. जपा. त्यामुळे नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत गेल्यावरही चिंता व मानसिक व्यग्रता देईल. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु आहेच. तो अध्यात्म व सामाजिक कार्य यांची मनापासून आवड असणारांना अनुकुल प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास, अपेक्षाभंग व प्रवासात अडचणी येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" .तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान भावना प्रबळ होईल, त्यातून शरीरपीडा, दगदग, श्रम कराल व थकून जाल. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, आचारविचार उच्च व उदार राहतील, सहकार्य लाभेल, क्वचित कोणास प्रसिद्धी मिळेल. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो या महिन्याच्या प्रथम सप्तांहात अनुकुल होईल; पण त्यानंतरच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. शिवाय नियोजित कार्यात अडचणी येणे, कार्यदिरंगाई होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परीस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, वडिलधाऱ्याचा विरोध, निराशा, भय यांचा अनुभव घ्यावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व या राशीच्या नोकरदार मंडळींना तसेच स्वतंत्र व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शुक्र-शनि -नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व कलात्मक नोकरी-व्यवसाय

असणारांना अडचणी, त्रास सहन  करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल  होईल व सर्व सुखाचे असेच घडेल. धनलाभ होईल व मन:शांती लाभेल. येथील नेपच्यून मनोवैज्ञानिक  व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत गेल्यावर प्रतिकुल  असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत संपूर्ण महिन्याच्या काळात शनि असून तो रविसह असल्यामुळे नोकरी-व्यवसायात अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत गुरु असून तो  अनुकुल  होईल व त्याच्यामुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गानी धनलाभ होणे संभवते, या राशीच्या विवाहेच्छूना  विवाहयोग येणे संभवते, शिवाय मित्र वाढ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत राहू  व वक्री हर्षल असून   येथील राहूमुळे दिखाऊ आचरण होईल; पण अर्थलाभ होणेही संभवते. येथील वक्री हर्षलमुळे   बेअब्रू  आणि वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. जपा.. शिवाय सांपत्तिक अडचणी, अकारण शत्रुत्व होणे, अपघात होणे  संभवते.  श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची  व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल   होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी  "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा,  ज्यांचे जन्मनक्षत्र  रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी  "ओम सोमसोमाय नमः:" तर मंत्राचा १०८ वेळा  जप करावा.

**(३) मिथुन** - या राशीच्या पंचम स्थानी तुळा  राशीत केतू असून त्याच्यामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय स्थावरसंबंधी समस्या मनस्ताप देतील. तसेच अनारोग्याचा त्रास होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत बुध  असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत हा बुध  महिन्याच्या प्रथम सप्ताहात दु:खदायकच होणे संभवते. त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. पण नंतरच्या संपूर्ण काळात तो सुखकारक होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होऊन यश लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि आहेच. पण तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत जात आहे.  अशा परिस्थितीत हा रवि  महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, हाती घेतलेल्या कार्यात अपयश

येणे, संततिसुखात  बाधा येणे, अपघात होणे, मानसिक ताण सहन करावा लागणे, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागणे अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शुक्र-

शनि -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती, सुखसमाधान लाभेल. क्वचित कोणास कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व विशेष करून कलात्मक नोकरी व्यवसाय असणारांना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत प्रथांपासून गुरु आहेच. तो बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व राहूमुळे नोकरीत ज्यांच्या हाती अधिकार पद आहे अशांपैकी काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल.जपा. त्यांनी मनावर ताबा ठेवून तो मोह टाळावाच. नपेक्षा "होत्याचे नव्हते होण्यास " वेळ लागणार नाही. जपा. येथील वक्री हर्षलमुळे सर्व काही अनिश्चित असेच घडेल. शिवाय मित्रांशी भांडणे होणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो पूर्णपणे अशुभच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, आर्थिक चिंता, वाद, भांडणे होणे, मानहानी होणे अशापैकी घटना घडणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे व दुर्गादेवी स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क** - या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही. सतत कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो केवळ महिन्याच्या प्रथम सप्ताहातच अनुकुल होईल व शक्य असेल तर कार्यसिद्धी होईल. पण त्यानंतरचा संपूर्ण काळ तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य,

दु:ख, भांडणे होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. दु:खदायक घटना घडतील, संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शुक्र-शनि -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकूल व लाभदायकच होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात भरपूर अर्थलाभ होणे संभवते. ज्याच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने धनलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या शुक्रामुळे गुरुकृपा, थोर कृपा, सुसंगती, ऐषाराम मिळू शकेल. क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. नेपच्यून महिन्याच्या पूर्वार्धात विषभयकारक व जलभयकारक असून या काळात बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत असलेला शनि अनारोग्य, दु:ख, दैन्य देण्याची शक्यता आहे. तसेच तो अपघातकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु आहेच. त्याच्यामुळे उत्कर्ष होईल, प्रगतीच्या संधी मिळतील, अध्यात्मात उपासनेद्वारे प्रगती करणे शक्य होईल, प्रवासाचे योग येतील, क्वचित कोणास कीर्ती-प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहू अनुकुल होईल व त्याच्यामुळे काहींना नोकरीत अधिकार पद मिळेल, काहींचा सन्मान होईल; तर काहींना त्यांच्या कार्यक्षेत्रात यश मिळेल. येथील वक्री हर्षलमुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. नोकरीत पदोन्नती होईल. पण तो वक्री असल्यामुळे सहजासहजी अशा गोष्टी घडतीलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कष्ट-परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. काही मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होईल. पण त्याच्यामुळे मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:”

तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:’ तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह** - या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतू असून तो मानसिक दु:खदायक असणार आहे. त्यासाठी या राशीच्या मंडळींनी आध्यात्मिक उपासनेत मन रमवावे. या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात ह्या बुधामुळे संतती-स्त्रीपासून मनस्ताप दिला जाणे संभवते. शिवाय त्यामुळे मंद बुद्धी होणे संभवते. त्यानंतरचा महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, धनदायक व सुखाचाच जाईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि आहेच. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व अनारोग्यकारक होणे संभवते. पण तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शुक्र -शनि -नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील शुक्र व नेपच्यून हे दोन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत जात आहेत. -अशा परिस्थितीत शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल. त्याच्यामुळे विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. महिन्याच्या उत्तरार्धात कमी श्रमात अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने अचानक धनलाभ होईल. पण या राशीच्या वृद्ध मंडळींना तो प्रतिकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत असलेल्या नेपच्यूनमुळे महिन्याच्या पूर्वार्धात विवाहितांच्या वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत गेल्यावर तो जलभयकारक व विषभयकारक होईल. त्या काळात खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत आरंभापासून शनि आहेच. तो प्रतिकुल असून दु:ख, दैन्यकारक होणेच संभवते. शिवाय तो अपघातकारक असून अनारोग्यकारकही होईल. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे ज्यांच्या हाती अधिकारपद आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह निर्माण होईल. पण त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. येथील वक्री हर्षलमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशवारीचे योग येतील. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाही तो काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे

स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीभगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओंम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळां जप करावा.

(६) **कन्या** - या राशीच्या धनस्थानी केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, धननाश होणे संभवते. पण गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. काही मंडळींना संततीपासून व स्त्रीपासून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि आहेच. पण तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या अशापैकी घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील व मन:शांती लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शनि,-शुक्र-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मींन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत येथील शनि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे गैरसमजाने भांडणे होतील व अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. शिवाय अनारोग्य होणेही संभवते. पण शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या कलाकारांजवळ कलागुण असूनही ते प्रकाशित होण्यास संधीच मिळणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गेल्यावर या राशीच्या विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, पण येथील नेपच्यूनमुळे महिन्याच्या पूर्वार्धात उगीचच आपणांस काही आजार झाल्याची किंवा काल्पनिक चिंतेची भावना त्रस्त करीतसे दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु

आहेच. त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना  विवाहयोग येणे संभवते. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. अर्थलाभ होईल, प्रवासयोग संभवतो. शिवाय नवे स्नेहसंबंध जुळून येण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असून या राशीच्या काही अधिकार पद असणाऱ्या मंडळींच्या मनात वाम मार्ग धन मिळविण्याचा मोह उफाळून येईल. पण त्यांनी कटाक्षाने मनाला ताब्यात ठेवून तो मोह टाळावाच. तेच सुखाचे होईल. त्याशिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या स्थानी असलेला वक्री हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे मानहानी होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे प्रवासात मनस्ताप व मानहानी होणेही संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर “ शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा , ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून तो सुखकारक होईल; पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे आपले वाहन सतत सावधानतेने व नियंत्रित वेगानेच चालवा. तसेच रस्त्यावरून जाताना सतत सतर्क व सावध राहूनच मार्गक्रमण करा. या आशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतरच त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. पण धननाश होणे संभवते. पण महिन्याच्या प्रथम सप्ताहात हा बुध प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व होणे, हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत रवि असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, कौटुंबिक त्रास, अपघात, संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या, नोकरीत वरिष्ठांचा जाच, नातेसंबंधात फारकत अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शनि -शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील शुक्र आणि नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत येथील शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य

होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी मीन  राशीत गेल्यावर कलाकार आपल्या कलेत कितीही पारंगत असला तरी त्याला आपल्या कलेतील प्रगती दाखविण्यास संधीच मिळणार नाही. तसेच येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय कोमल व भावनाशील होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात हा नेपच्यूनअध्यात्म, गूढ संशोधन, यांची मनापासून आवड असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व सुखकारक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गेल्यावर उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना किंवा एखादी काल्पनिक चिंता अस्वस्थ करील. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शनि आहेच. त्याच्यामुळे बुद्धी अगदी व्यवहारी, स्वार्थी व संशयी अशी होईल. पण तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना चिकाटीने कार्यरत ठेवील. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु आहेच. त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल व काही मंडळींना नोकरचाकराचे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे मनात कपटी विचार प्रबळ होणे संभवते. तसेच तो या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक सुखात बाधा निर्माण करीतसे दिसते. जपा. येथील वक्री हर्षलमुळेही पतिपत्नीत मतभेद, भांडणे, दोघापैकी कोणाचे लहरी, विक्षिप्त वागणे, अशापैकी कारणांनी वैवाहिक जावनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे अनारोग्य, हाडमोड होणे संभवते. तसेच अकारण खूप कष्ट, परिश्रम कराल. शिवाय तो पाणी, वीज यांपासून धोकादायक असल्यामुळे विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. तसेच खोल पाण्यात पोहू नका. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:’ तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या धनस्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, शत्रुत्व, हितशत्रूंपासून त्रास अशापैकी घटना घडणे संभवते. पण त्याच्यामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि आहेच.

पण तो महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जात आहे. . त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल  होईल व  त्याच्यामुळे सर्व सुखाचेच घडेल. आरोग्य उत्तम राहील, नोकरीत वरिष्ठ तुमच्यावर प्रसन्न होतील. क्वचित कोणास मानाचे स्थान वा एखादे उच्च पद मिळणेही संभवते.  पण महिन्याच्या उत्तरार्धात  तो प्रतिकुल  होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, दु:ख, आर्थिक समस्या निर्माण होणे संभवते.  तसे घडल्यास  गहरे  नैराश्य येईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शुक्र-शनि -नेपच्यून  असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र शेतीवाडी असणारांना लाभदायक होईल, ऐषाराम मिळेल  व महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत  प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल.  महिन्याच्या पूर्वार्धात येथील नेपच्यूनमुळे गैरसमज, घोटाळे होणे संभवते. पण  महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत गेल्यावर अध्यात्म व गूढ संशोधन या क्षेत्रात रस असणारांना  अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण  त्याच्यामुळे मनस्थिती अति  भावनाशील होणे संभवते.  या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत असलेल्या शनीमुळे गृहसौख्यात बाधा निर्माण होणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येऊ शकेल. या राशीच्या पंचम स्थानी मीन  राशीत प्रथमपासून गुरु  आहेच. तो सर्व प्रकारे  सुखकारकच  होईल. ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत राहू  व वक्री हर्षल असून  येथील राहूमुळे ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे  अशापैकी काही मंडळींना  अशा संबंधामुळे धनलाभ होणे संभवते. पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते.   येथील हर्षल  बौद्धिक व उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना पूरक होणार असला तरी  तो वक्री असल्याने अडचणी , अडथळे सहन करतच होईल तेवढी प्रगती करणे शक्य होईल. पण या क्षेत्रातील मंडळींनी सतत खोल विचार करत बसू नये.  कारण  तसे केल्यास डोकेदुखी किंवा  मेंदू विकाराचा आजार त्रस्त  करील. जपा.  या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत मंगळ  असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक जीवनात वाद, मतभेद, भांडणे, अन्य कटकटी अशापैकी कारणानी  सुखसमाधान लाभणार नाही.  शिवाय तो अनारोग्यकारक होणेही  संभवते.  ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी  भागीदारीत बाधा येणार नाही  याची काळजी घ्यावी.  या राशीच्या व्यय स्थानी तुळा  राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी, चंचल असा होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल  होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण  करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना

मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या धनस्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मनस्थिती चंचल, लहरी अशी होणे संभवते. त्याशिवाय धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा होणेही संभवते. तो दु:खदायक असला तरी त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे, ड़ोळ्यांचे अनारोग्य, आर्थिक समस्या त्रस्त करतीलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्व सुखसमाधान लाभेल, काही मंडळींना धनलाभ होणेही संभवते. नोकरीत वरिष्ठ प्रसन्न होतील व काही मंडळींना बढती मिळेल; तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यताही जाणवते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शुक्र-शनि -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत जात आहेत. त्यामुळे शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात या राशीच्या विविध कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना भूमिलाभ होईल; तर काहींना धनलाभ, प्रतिष्ठा, मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. ज्यांची शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. ऐषाराम लाभेल. नेपच्यूनमुळे महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशवारीची संधी मिळेल. तसेच अध्यात्म, गूढ संशोधन यात रुचि असणारांना तो अनुकुल प्रगतिकारक व यशदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शनि आहेच. त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना उत्तम नोकरी मिळू शकेल; तर काहींना नवे, आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु आहेच. त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी असह्य मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील. या राशीत पंचम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे या राशीच्या मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते.

तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत काहीही कारणाने अडथळे निर्माण होणे संभवते. पण या राशीच्या ज्या मंडळींचे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र आहे अशांना येथील वक्री हर्षल काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच काही भाग्यवंतांना अंतर्ज्ञान प्राप्त होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो अनारोग्यकारकच होईल. त्याशिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना प्रवासयोग येईल, हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल, धनलाभ व सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निर्ऋतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर** - या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मनस्थिती अतिशय चंचल, लहरी अशी होईल. त्यातून अपयश, मानहानी, अनारोग्य, धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा होणे संभवते. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, भांडणे, मनस्ताप, चिंताभय, आर्थिक समस्या, वित्तहानी, डोळ्याचे अनारोग्य अशापैकी घटना अस्वस्थ करतील. जपा. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शनि -शुक्र- नेपच्यून असे तीन ग्रहआहेतच. पण येथील शुक्र-नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुलच होईल . व त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. काही मंडळींना भूमिलाभ तर काही मंडळींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. येथील नेपच्यून महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक संकटे, चिंता त्रस्त करतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात ज्यांना अध्यात्म व गूढ संशोधन यांत रस आहे त्यांना हा नेपच्यून अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग संभवतात. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत

असलेल्या शनीमुळेही आर्थिक संकटे, कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत गुरु असून तो या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल व काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. काही मंडळींना प्रवासाचे योग संभवतात. पण एखाद्या भावंडांकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे मनस्थिती उदार, हरहुन्नरी, होईल व हातून काही कर्तृत्व घडेलसे दिसते. पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. येथील वक्री हर्षलमुळे कशातही सुखसमाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. .या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो वैद्यकीय शिक्षण घेत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण संततीपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे तापदायक गैर आचरण, कोणास स्थावरसंबंधी चिंता त्रस्त करतील. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत . केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रावण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ-** या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळी ढोंगी आचरण करून काळ व्यतीत करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे धनलाभ, मित्रलाभ, सुखसमाधान लाभेलसे दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्यस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मानहानी, नियोजित कार्यात अपयश येणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे.अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे शरीरपीडा, मानभंग, अनारोग्य, मनस्ताप व चिंताभय अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि-शुक्र -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील शनीमुळे संकट परंपराच कोसळण्याची शक्यता दिसते. आर्थिक समस्या, कोर्ट प्रकरण, नवे लचांड त्रस्त करण्याची

शक्यता दिसते. येथील शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व सुखदायकच होईल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ होईल. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल होईल, संवेदना जलद होतील व मनाविरुद्ध थोडे काहीही घडल्यास नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु आहेच. त्याच्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल, अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे मनस्थिती हरहुन्नरी होईल, हातून कर्तृत्व घडेल; पण बंधुसुखात बाधा येणे संभवते. येथील वक्री हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल; पण प्रगतीत अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी मनापासून श्रद्धेने “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:’ तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौ कौटुंबिक जीवनात व विवाहितांच्या वैवाहिक जीवनात गैरसमज, भांडणे, वाद होणे संभवते. त्यामुळे सुखसमाधान लाभणारच नाही. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत बुध असून तो दिनांक ७ पासून या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. मित्रसुख लाभेल व धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासून रवि आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल, लाभदायक व यशदायक होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व अकारण दगदग, शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून शनि -शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील शनीमुळे संकटपरंपराच कोसळण्याची शक्यता दिसते. अशा परिस्थितीत कौटुंबिक व आर्थिक व्यवहार सावधानतेने व काळजीपूर्वकच करा. या

राशीच्या व्ययस्थानी असलेले शुक्र व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व सुखसमाधानकारकच होईल. चैन होईल व विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी असलेला नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व यशदायक होईल. पण त्याच्यामुळे कसली तरी चिंता मानसिक व्यग्रता वाढवेल व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे मनस्थिती अति कोमल होणे संभवते. तसे झाल्यास मानसिक संवेदना अति जलद होतील, मन उदास होईल व त्याचा परिणाम म्हाणून नैराश्य येऊ शकेल. या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत प्रथमपासून गुरु आहेच. तो अनुकुल व शुभकारक होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, तसेच तो उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व लेखकांना अनुकुल व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे नोकरीत अधिकार पद मिळणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील व कुटुंबात कलहकारक परिस्थिती निर्माण होईल. जपा. येथील वक्री हर्षलमुळे मनस्थिती अति चंचल, अस्थिर होईल, अविचारी, विचित्र आचरण घडेल, अर्थहानी होईल. शिवाय त्याच्यामुळे आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही ध्यानात येणार नाही. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तृत्व घडेल, प्रवासयोग येईल; पण त्याच्यामुळे दुखापत होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्याचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====